/

# सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर)
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

जा.क्र.जीआयइ/ ४७ /२०१७
दिनांक ०७/०३/२०१७

## जाहीर प्रगटन

**विषय:- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि.२५-मार्च २०१७ रोजी २१ व्या दीक्षांत समारंभात सहभागी मान्यवर अतिथी, विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी याना भोजन व विद्यार्थ्यांना आल्पोपहार पुरवीणे बाबत..**

**संदर्भ:- भोजन समीती बैठक दि.०४/०३/२०१७.**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि. २५ मार्च २०१७ रोजी २१ व्या दीक्षांत समारंभाचे आयोजन केले आहे. या निमीत्त मान्यवर अतिथी, विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी (साधारणत: २५० व्यक्ती) याना भोजन देणे प्रस्तावीत आहे. **भोजनाचा मेनु** पुढील प्रमाणे राहील वराडी कोप्ता करी , आमरस (केशर आंबा)/आम्रखंड , भेंडी मसाला फ्राय, दाल तडका , जिरा राईस , मिक्स पापड, आईसक्रीम , मठा, चिलीकट पकोडा, चपाती , ज्वारी भाकरी, पुरी, ठेचा, सलाद , लोणचे बिसलरी पाणी इत्यादी मेनुप्रमाणे भोजनाचा पुरवठा करुन भोजनाची व्यवस्था करावी लागेल.

तसेच साधारणत: ३५०० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना अल्पोहार देणे प्रस्तावीत आहे. **एका अल्पोपहारामध्ये** - मसाला पुरी ६ नग (एकुण २०० ग्रॅम), छोले भाजी (१५० ग्रॅम), पुलाव (१५० ग्रॅम), बालुशाही (१०० ग्रॅम), ठेचा, लोणचे व पाणी पाऊच एक, प्लास्टीक चमच इत्यादी एकत्रित अल्युमिनियम फॉईल (कंटेनर) मध्ये पॅक करुन पुठ्ठाबॉक्स मध्ये पुरवठा करणे आवश्यक आहे.

**भोजन व अल्पोपहार हे दोन्ही वेगवेगळे प्रकार असल्यामुळे या दोन्हीचे दर दरपत्रकामध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावेत.**

वरील विवरणानुसार भोजन तसेच अल्पोपहार पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी, सोबत जोडलेल्या अटीशर्तीचे पालन करणे बाबतचे हमीपत्र (१०० रुपयाच्या बॉड पेपर वर) व दरपत्रक बंदलिफाफा **अध्यक्ष, भोजन व्यवस्था समिती तथा सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर) व.ना.म.कृ.वि.,परभणी** यांचे नावे दि.१५/०३/२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

दाखल केलेले बंदलिफाफा दरपत्रके दिनांक १६.०३.२०१७ रोजी सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर) व.ना.म.कृ.वि.,परभणी यांच्या कार्यालयात सकाळी. १०.०० वाजता उघडण्यात येतील.

**सोबत: अटी व शर्ती, हमीपत्र**

**अध्यक्ष**
**भोजन व्यवस्था समिती तथा**
**सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर)**
**व.ना.म.कृ.वि.,परभणी**

२२. सुधाय सभा मिळ

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि.२५-मार्च २०१७ रोजी २१ व्या दीक्षांत समारंभात सहभागी मान्यवर अतिथी, विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी याना भोजन व विद्यार्थ्यांना आल्पोपहार पुरवीणे बाबत_निविदेच्या अटी व शर्ती**

१. भोजन व अल्पोपहार हे दोन्ही वेगवेगळे प्रकार असल्यामुळे या दोन्हीचे दर दरपत्रकामध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावेत.

२. अनामत रक्कम रूपये १५,०००/- (अक्षरी रू. पंधरा हजार केवळ) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट नियंत्रक, वनामकृवि, परभणी यांचे नावे देण्यात यावा, डिमांड ड्राफ्ट न जोडल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

३. ज्या कंत्राटदाराने यापूर्वी एखाद्या शासकीय/निमशासकीय संस्थेच्या २५० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींच्या भोजन व्यवस्थेचे कार्यक्रम तसेच ३५०० किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तीच्या आल्पोपहार व्यवस्थेचे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले आहेत. **अशा कंत्राटदाराने काम केलेल्या संबंधित संस्थेचे प्रशस्तीपत्र निविदेसोबत जोडणे बंधनकारक आहे.** या प्रकारच्या कामाचा अनुभव असल्यास त्याला प्राधान्य देण्यात येइल.

४. भोजनाचे/ आल्पोपहाराचे दर हे बाजार किमतीशी सुसंगत व वाजवी असावेत.

५. यशस्वी निविदाधारकास नियंत्रक, व.ना.म.कृ.वि., परभणी यांचे नावे सुरक्षा ठेव म्हणुन पुरवठा करावयाच्या किंमतीच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. शासन निर्णय दि. ३०/१०/२०१५ मधील नियम ३.१.२४ मध्ये **नमुद केलेले सर्व कर कंत्राटदारास भरावे लागतील.** मुल्यवर्धित कर, आयकर, नोंदणी प्रमाणपत्र निविदाधारक अथवा फर्मच्या नावे असणे आवश्यक आहे.

६. निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखा मधील बदलाबाबत निविदा मंजुर करणे अथवा सर्व निविदा ना-मंजुर करुन पुनर्निविदा करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवला आहे.

७. सदरील निविदे संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास ते परभणी न्यायालय अंतर्गत राहुनच सोडविण्यात येतील

८. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे नैसर्गिक अपत्तीमुळे होणा-या नुकसानिची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

९. भोजन/आल्पोपहार उत्कृष्ठ व दर्जेदार मालापासून तयार करणे अनिवार्य आहे. तसेच भोजन निर्मीतीकरिता वापरण्यात येणारे साहित्य (भांडी) स्वच्छ असावीत.

१०. वाटपा पुर्वी भोजन/आल्पोपहार तपासणीकरिता देणे बंधनकारक आहे. भोजन/आल्पोपहार सेवन केल्यामुळे आरोग्यास कुठलाही धोका निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. आरोग्यास हानी पोंहचल्यास त्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

११. सुयोग्य सेवा मिळण्यासाठी भोजन/आल्पोपहार वाटप करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. तसेच वाटप करण्यासाठी सेवकांची नियुक्ती करावी लागेल. सदर सेवक हे विनम्र सेवा देणारे असावेत तसेच सेवक स्वच्छ गणवेषात असणे आवश्यक आहे.

१२. भोजन/आल्पोपहार वाटप निर्देशित केलेल्या वेळेत व ठिकाणी पोंहचविण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. भात तयार करण्यासाठी बासमती तांदुळ वापरणे अनिवार्य आहे.

तसेच भोजन/आल्पोपहार तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे सर्व साहित्य हे नामांकित कंपनीचे (Agmark) प्रमाणित सीलबंद व उच्च प्रतिचे वापरणे बंधनकारक आहे.

१३. कंत्राटदारास त्याच्या देयकाची अदायगी धनादेशाव्दारे करण्यात येईल. कंत्राटदारास कुठल्याही प्रकारचा अग्रीम मिळणार नाही. भोजनाच्या/आल्पोपहाराच्या संख्येप्रमाणे (कुपना नुसार) देयकाची अदायगी करण्यात येईल. तसेच जर वेळेवर भोजनाची/आल्पोपहार संख्या वाढल्यास मंजूर दराप्रमाणे वाढीव देयकाची अदायगी करण्यात येईल. भोजनाचा/आल्पोपहाराचा समाधानकारक पुरवठा केल्यावरच देयकाची अदायगी करण्यात येईल

१४ .मोहरबंद निविदा पाकीटात खालील कागदपत्रे सादर करावीत. कागद पत्राची पुर्तता न केल्यास निवीदा स्विकारल्य जाणार नाही.

**अ.** अनामत रक्कम रूपये १५,०००/- (अक्षरी रू. पंधरा हजार केवळ) चा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट **नियंत्रक, व.ना.म.कृ.वि., परभणी** यांचे नावे असावा

**ब.** खालील प्रमाणपत्राच्या सत्यप्रती

१. शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र.(चालु वर्षाचे)
२. पॅनकार्ड किंवा आयकर निपटारा प्रमाणपत्र.
३. अन्न व औषधी विभाग महाराष्ट्र शासन यांचे खाद्यविक्रेते प्रमाणपत्र.
४. व्यावसायीक कर नोंदणी प्रमाणपत्र.
५. सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र.
६. मुल्यवर्धित कर (व्हॅट) नोंदणी प्रमाणपत्र.
७. प्रशस्ती प्रमाणपत्र.

**क)** दरपत्रक भरलेली निविदा दर अंकात व अक्षरी लिहावे व हमीपत्र रु.१०० च्या बॉडपेपर वर द्यावे.

**ड)** पाकीट मोहरबंद करून **२१ व्या दिक्षांत समारंभ व.ना.म.कृ.वि.,परभणी भोजन/आल्पोपहार निविदा** असे स्पष्ट लिहून कंत्राटदाराचे नांव, स्वाक्षरी व शिक्का सहीत निविदा सादर करावी.

**अध्यक्ष**
**भोजन व्यवस्था समिती तथा**
**सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर)**
**व.ना.म.कृ.वि.,परभणी**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दि.२५-मार्च २०१७ रोजी २१ व्या दीक्षांत समारंभात सहभागी मान्यवर अतिथी, विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी याना भोजन/विद्यार्थ्यांना अल्पोपहार पुरवीणे बाबत हमीपत्र**

## हमीपत्र (१०० रुपयाच्या बॉड पेपरवर)

मी / आम्ही अशी हमी देतो की, २१ वा दीक्षात समारंभ व.ना.म.कृ वि.,परभणी दि.२५/०३/२०१७ रोजी भोजन/अल्पोपहार पुरवठा करण्यासंबंधी निविदेतील अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचल्या असून मला / आम्हाला त्या मान्य आहेत. करीता हमीपत्र लिहुण देत आहे/आहोत.

स्वाक्षरी

फर्मचे नांव व शिक्का

नोंदणी क्रमांक

दूरध्वनी क्रं.

भ्रमणध्वनी क्रं.

दिनांक :

ठिकाण :

# २१ वा दीक्षांत समारंभ-२०१७

## भोजन दरपत्रक

(वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे
दि.२५-मार्च २०१७)

प्रती ,

अध्यक्ष
भोजन व्यवस्था समिती तथा
सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर)
व.ना.म.कृ.वि.,परभणी

विषयः भोजन व आल्पोपहार व्यवस्थेसाठी चे दर पत्रक

संदर्भः आपले जाहिर प्रगटन क्रमांक जीआयई/४७/२०१७ दि.०७/०३/२०१७.

| अ.क्र. | विवरण | दर (रु.) |
|---|---|---|
| १. | **भोजन**<br>वराडी कोप्ता करी ., आमरस(केशर आंबा)/आम्रखंड , भेंडी मसाला फ्राय, दाल तडका , जिरा राईस , मिक्स पापड, आईसक्रीम , मठा, चिलीकट पकोडा, चपाती , ज्वारी भाकरी, पुरी, ठेचा, सलाद , लोणचे  बिसलरी पाणी इत्यादी | दर प्रति भोजन |
| २. | **आल्पोपहार**<br>मसाला पुरी ६ नग (एकुण २०० ग्रॅम), छोले भाजी (१५० ग्रॅम), पुलाव (१५० ग्रॅम), बालुशाही (१०० ग्रॅम), ठेचा, लोणचे  व पाणी पाऊच एक, प्लास्टीक चमच इत्यादी एकत्रित अल्युमिनियम फॉईल (कंटेनर) मध्ये पॅक करुन पुठ्ठाबॉक्स मध्ये | दर प्रति आल्पोपहार |

दिनांक :
ठिकाण :

स्वाक्षरी
निविदा धारकाचे नांव :
नोंदणी क्र.व शिक्का